# Jai Maa Saraswati Gyandayini

An International Multidisciplinary e-Journal

**Vol.2, Issue-II**
**Oct. 2016**

**ISSN-2454-8367**
**IMPACT FACTOR: 4.032 (IIJIF)**

**Indexed:**
RESERCHER ID (THOMSON REUTERS), IIJIF, IIFS, SIS, ROAD, DOIDS, ASJ, COSMOS, ESJI, SCHOLARSTEER, ISRA, CITE FACTOR, IJINDEX, MIAR, INDIAN SCIENCE, GOOGLE SCHOLAR, BERITA-DAN INFORMASI, ACADEMIC RESOURCE INDEX

***PEER REVIEWED, OPEN ACCESSED & INDEXED e-JOURNAL***

**Editor-In-Chief**
**Raj kumar verma**


Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli


**Contact:**
52 Mayur Market, Thatipur Morar Gwalior M.P. (India) Pin- 474011
Ph.: +91 0751-4066000, Mob. +91 9755599942
Email:- *jmsjournal.in@gmail.com*, *jmsjournals.in@gmail.com* Website: *www.jmsjournals.in*

Jai Maa Saraswati Gyandayini
An International Multidisciplinary e-Journal
(Peer Reviewed, Open Accessed & Indexed)
Web: www.jmsjournals.in Email: jmsjournals.in@gmail.com
ISSN: 2454-8367
Vol. 2, Issue-II
Oct. 2016
Impact Factor : 4.032 (IIJIF)

# भारतीय दलित साहित्य

**प्रा. दिलीप घोनमोडे**
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी, ता. जि. गडचिरोली. 441208

**डॉ. विजय रेवतकर**
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी, ता. जि. गडचिरोली. 441208

दलित साहित्य आज भारताच्या वेगवेगळ्याा राज्यातून निर्माण होऊ लागले। डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विषमतेविरुद्ध आंदोलन संपूर्ण भारतभर चालू होते। त्यांच्या चळवळीत महाराष्ट्रातील महार दलिता व्यतिरिक्त चांभार, मातंग, डोहार इ. जातीचे पुढारी कार्य करीत होते। डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' 'बहिष्कृत भारत' इत्यादी पाक्षिकांतून साहित्यिकांना जो संदेश दिला त्याचे पडसाद प्रथम महाराष्ट्रात मराठी दलित साहित्यिकांत निर्माण झाले होते। अण्णाभाऊ साठे, दया पवार, लक्ष्मण गायकवाड, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, ज्योती, लांजेवार, हिरा बनसोडे इत्यादी कवी कवियित्रींनी मराठी साहित्यात आशय आणि अभिव्यक्तीमध्ये वेगळे युगप्रवर्तन केले अध्यात्म ईश्वर भक्तीच्या आवर्तात सापडलेल्या मराठी साहित्याला कोंडवाड्यातून बाहेर काढले. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनाच्या काळातच मार्क्सवादही भारतात आला मार्क्सवादी साहित्यिकांनी वंचित शोषितांच्या शोषणाचे संदर्भ घेऊन साहित्य लिहायला सुरूवात केले परंत मुक्तिबोध, नारायण सुर्वे शिरूरकर, बेडेकर आदींचा अपवाद वगळता खऱ्या अर्थाने दिन दलिततांचे विद्रोही साहित्य आंबेडकरांची प्रेरणा घेऊन निर्माण झाले आहे। महाराष्ट्रात आता हेच दलित साहित्य आंबेडकरवादी साहित्य म्हणून ओळखले जाते।

महाराष्ट्रात निर्माण झालेले बलूतं, उचल्या, उपरा, कोल्हाट्याचे पोर इ. साहित्याचे अनेक भारतीय भाषेत अनुवाद झाले. 1980–90 नंतर भारताच्या अनेक प्रांतीय भाषेतून त्याचे प्रतिबिंब भारतातील अनेक राज्यातील दलित साहित्यातून दिसायला लागले 'शब्दानीच पेटतात घरे दारे देश आणि मानसेसुद्धा' हे शब्द समस्त भारतीय विद्रोही प्रतिभेची मशाल बनले।

## महाराष्ट्रीय दलित साहित्यः

दलित साहित्याची चळवळ महाराष्ट्रातच निर्माण झाली. डॉ. आंबेडकर हे महाराष्ट्रीयच होते। त्यांचे सामाजिक राजकीय आंदोलन अखिल भारतीय स्वरूपाचे असले तरी आंदोलनाचे स्वरूप सर्वाधिक महाराष्ट्रातच राहिले. 'मूकनायक' 'बहिष्कृत भारत' ही त्यांची नियतकालिके मुंबई प्रांतातून सुरु झालेली होती। 1920 ला स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकाराणी सभेचे, शिकवा, चेतवा, संघटित करा' हे ध्येय मुंबई प्रांतातच ठरले। दलित



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli